जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८५९ दिनांक - ०९/१२/२०२३**

# अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर

## पिस्टल व चार काडतुसे जवळ बाळगणा-या इसमास केले जेरबंद

दिनांक ०८/१२/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते या त्यांचे अधिनस्त स्टाफसह भारती विदयापीठ पो स्टे कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना अंमली पदार्थ विरोधी पथकातील अंमलदार मनोज साळुंके व विशाल शिंदे यांना बातमी मिळाली की, पुणे आंबेगाव खुर्द मसाला कंपनीजवळ जांभुळवाडी पाझर तलावा जवळ रेकॉर्डवरील गुन्हेगार ओकांर वाघमारे याने त्याचा भाऊ विष्णु वाघमारे याचेकडे एक लोखंडी पिस्टल व काडतुसे दिली असुन तो ते घेवुन पुणे आंबेगाव खुर्द जांभुळवाडी पाझर तलावा जवळ येथे येणार आहे नमुद प्रमाणे मिळालेली बातमी पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते यांनी तात्काळ वरिष्ठांना कळवुन त्याप्रमाणे तात्काळ कारवाई करण्याचे सुचना दिल्या.

त्यानुसार पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते व स्टाफने मिळालेले बातमीनुसार छापा कारवाई करुन इसम नामे **विष्णु बाळु वाघमारे, रा.शनिनगर,पुणे यांस त्याचा भाऊ ओकांर बाळु वाघमारे रा सदर** याने त्याचे कडे बेकायदेशीररित्या ठेवण्यास दिलेला एक लोखंडी देशी गावठी बनावटीचे पिस्टल, त्यामध्ये चार काडतुसे,एक ॲपल कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण १,११,०००/- रु चा ऐवज जप्त करुन त्यास अटक करुन त्याचे विरुध्द **भारती विदयापीठ पो स्टे गु र नं ७९३/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), महाराष्ट्र पोलीस का.कलम ३७(१) सह १३५** प्रमाणे गुन्हा नोंद करुन त्यास गुन्हयात अटक केली आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे,मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे १, श्री सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते, पोलीस अंमलदार विशाल शिंदे, योगेश मोहिते, मनोज कुमार साळुंके, मारुती पारधी, पांडुरंग पवार,राहुल जोशी, ज्ञानेश्वर घोरपडे, प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, संदिप शिर्के, संदेश काकडे, नितेश जाधव,सचिन माळवे,यांनी केली आहे.